ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 11 | JULY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# 19 वे शतकात 'उमरावती' आशिया खंडातील कापसाची मुख्यपेठ

प्रा. डॉ. अनिल ठाकरे
इतिहास विभाग प्रमुख , श्री गाडगे महाराज महाविद्यालय,मुर्तीजापुर.

## प्रस्तावना :



वऱ्हाडात प्राचीन काळापासुन कापसीच पैदास होत होती. कापसाची मोठया प्रमाणावर लागवड करणे व कापसाचे सूत काढुन त्याचे कापड विणनेयाचा मुळ संषोधक वऱ्हाडाचा ऋषी गृत्समद असल्याचा उल्लेख ऋग्वेदातील व्दितीय मंडलात आहे. अठराव्या शतकापर्यंत वऱ्हाडात कापुस पिकविण्याची परंपरा सुरुच होती कापसातुन रुई व सरकी काढणे, रुई व्दारे सुत कातणे व सुतापासुन कापड विणल्या जात होते. एलिजपुर,बाळापुर, खोलापुर, येथे मोठया प्रमाणात उत्तम प्रतीचे कापड निघु लागले व ते वऱ्हाडबाहेर मोठया प्रमाणावर निर्यात होत होते.[1]''वऱ्हाडात आवष्यकतेनुसार कापडाचे विविध प्रकार निर्माण झाले त्यातील प्रसिध्द प्रकार म्हणजे खादी, रुमाल, पागोटे, रेषिमसाठी साडया वगैरे अचलपुरात तयार होत होते.[2] भारतातील सर्व जमीनी पैकी वऱ्हाडची जमीन कापसाचे पिकाकरीता उत्तम समजली जाते त्यात अमरावती जिल्हयाचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो.[3]

## उमरावतीची कापुस व्यवसाय :–

उमरावतीचे सावकार सेठ धनराज पोखरमल यांनी कपाषीच्या व्यवसायात विषेष लक्ष घातले ते आपली माणसे खेडोपाडी ठेवीत, शेतकऱ्यांना कर्ज देत, आणि कापुस निघाल्यानंतर तो या माणसाचे ताब्यात शेतकऱ्यांना द्यावा लागे. रुई अलग करुन बोजे बांधले जात हा कापुस नंतर इंग्रज व्यापारी विकत घेत व उमरावतीहुन 500 मैल दुर असलेल्या मिर्झापुर येथे हा माल बैलगाडीने नेत व तेथुन गंगानदीतुन नावेने 450 मैल दुर कलकत्यास पाठविला जात असे. नंतर जहाजाने हा कापुस परदेषात रवाना होई या बाबत हैद्राबाद येथील इंग्रजांचा रेसिडेन्ट कॅ. रेनॉल्ड याने इ.स.1845 साली, ईस्ट इंडिया कंपनीला एक अहवाल पाठविला होता तयात तो लिहीतो ''उमरावती शहर हे एक व्यापारी भरभराटीचे शहर असुन या ठिकाणी मारवाडी व काही उत्तर भारताचे सावकार होते. सेठ धनराज येथील प्रसिध्द व्यापारी आहे. त्याने कापसाचा व्यापार हाती घेतला होता. त्याने आपली माणसे खेडोपाडी ठेवली त्यांच्या मार्फत शेतकऱ्यांना कर्ज देत असे. कापुस आल्यावर तो या माणसाच्या ताब्यात द्यावा लागे उमरावती ही कापसाची फार मोठी बाजार पेठ होती. येथे अनेक गोदामे होती कापुस स्वच्छ केल्यानंतर तो तेथुन मिर्झापुर मागे कलकत्याला पाठविला जात होता कापसाची किंमत 750 पौंडला 54 रु. होती. एका बंजाऱ्याला एका बैलगाडीचे ( 240 पौंड) 7 रु.उमरावती ते मिर्झापुर पर्यंत गाडी भाडे मिळत असे.

उमरावतीहुन इंग्लंडला कापुस पाठविला जाई. त्यांची सरासरी किंमत खालील प्रमाणे पडत असे–

| | |
|---|---|
| एक पौंड कापसाची किंमत – | |
| कापसाचे मुल्य – | 1.05 |
| कर | 0.1 |
| दर मैलाचा प्रवास खर्च | 0.37 |
| जहाजात माल चढविण्याचा खर्च | 0.2 |
| इंग्लड पर्यंत जहाज भाडे | 0.52 |
| एक पौंड कापसाची एकुण किंमत – | 2.69 |

या प्रमाणे उमरावतीहून कापुस खरेदी करुन प्रथम खुष्कीच्या मार्गाने व नंतर जलमार्गाने इंग्लंड पर्यंत पोहचविणे इ. खर्चासह, एक पौंड कापसाला 2.69 इतकी किंमत त्यावेळी पडत असे.[4]

इ.स.1826 साली मुंबईच्या विकाजी पेस्तनजी फर्मने सर्व प्रथम वऱ्हाडच्या कापुस क्षेत्रात प्रवेष केला तेव्हापासुन मुंबईला उमरावतीचा कापुस जाऊ लागला. अषाप्रकारे वऱ्हाडच्या कापसाला मागणी वाढल्याने वऱ्हाडात कापसाचा पेरा वाढुन सर्व हिन्दुस्थानात वऱ्हाड प्रांत हा कापसाचा मुख्य प्रांत होऊन बसला ''उमरावती व खामगांव हया निजाम राज्यातील कापसाच्या प्रमुख बाजारपेठा आहेत. परंतु उमरावती हे कापुस व्यापाराचे सर्वात मोठे केंद्र असल्यामुळे उमरावतीचे नांव संपूर्ण कापुस भागाकरिता वापरले जाते. हंगामात कोटयावधी रुपयांची उलाढाल होऊ लागली.व संबंध आषिया खंडात कपाषीचे व्यापारात उमरावती शहराची प्रथम क्रमांकात गणना होऊ लागली. मध्यप्रांत वऱ्हाड समुद्र किनाऱ्यापासुन दुर असुन देखील मिर्झापुरला स्वस्त दारात कापुस पुरवितात हे आर्थीक क्षेत्रातील एक आष्चर्य मानावे लागेल.''[5]

''मि. मेसर यांनी इ.स. 1843 मध्ये उमरावतीचा कापूस मिर्झापुर येथे तपासला जो नमुना दाखविण्यात आला होता त्यात कोणत्याही तऱ्हेची भेसळ नव्हती.चागला रंग,मृदू व लांब धाग्याचा होता. आपल्या निवेदनात ते म्हणतात की, कापसाच्या हजारो गाडया उमरावतीहुन मिर्झापुरला नेतांना पाहील्या.''[6]

कॅप्टन डोरिन हा वऱ्हाडाचा रोड सुपरिन्टेन्डेट होता त्याने इ.स. 1848 मध्ये आपल्या निवेदनात असे म्हटले होते की, वऱ्हाडचा कापुस मुंबई जवळ असतांना देखील मिर्झापुरला का नेतात? याचे प्रमुख कारण असे की, निजामच्या राज्यात प्रत्येक नगरात कर द्यावा लागतो.परंतु मिर्झापुरला नेतांना त्याचा बचाव होतो, कारण उमरावतीहुन तीस मैलाचा प्रदेष सोडला की, नागपुर राज्याची सरहद्द लागते.

इ.स. 1853 मध्ये वऱ्हाड इंग्रजांच्या वहिवाटीसाठी त्यांचे ताब्यात आला आणि दुसरीकडे याच वर्षी मुंबई ते ठाणे रेल्वे सुरु झाली व तातडीने ही रेल्वे नंतर 1859 मध्ये कापुस पिकवणाऱ्या वऱ्हाड प्रांतात आणण्यात आली कापसाची पेठ म्हणुन त्याकाळी प्रसिध्द असलेल्या उमरावती येथे रेल्वेचा फाटा देण्यात आला.[7] हे केवळ मालाची खराबी न होता सुलभपणे मुंबईला कापुस नेण्यासाठीच करण्यात आले होते. तसेच युरोपियन माल येथील बाजारपेठात पोहोचावा हाही हेतु त्यामागे होता.

### उमरावतीचा कॉटन यार्ड :–

रेल्वे सुरु झाल्याने लहान गावापर्यंत व्यापाऱ्यांची माणसे हंगामापुर्वी जाऊन कापसाचा सौदा करीत कापुस निघाल्यावर तेथुन उमरावती केंन्द्रावर कापूस आणत तेथे बोझे बांधले जात असत मुंबईच्या इतर कंपन्यांचे एजंटही हंगामात बोजे खरेदीला येत असत कापसाचा धंदा वाढु लागल्याने या धंदयाला प्रोत्साहन देण्यासाठी उमरावतीला 'कॉटन यार्ड' सुरु करण्याचा प्रयत्न तत्कालीन डेप्युटी कमिष्नरनी केले. इ.स. 1867 मध्ये उमरावतीचा 'कॉटन यार्ड' अस्तीत्वात आला. इ.स. 1870 च्या गॅझेटियर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् मध्ये उमरावतीच्या 'कॉटन यार्ड' चा उल्लेख आहे. ''कापुस व्यापाऱ्यांची संख्या 93 दर्षविली आहे. त्यावेळी उमरावती कापुस बाजारात मुंबईचे भाटीये आणि युरोपियन व्यापारी कापसाचा व्यापार करीत असत.''[8] यावरुन इ.स. 1867 च्या सुमारास सावकाराकडुन केली जाणारी कापसाची खरेदी बंद होवुन कापुस बाजारातच शेतकऱ्यांचे कापसाची खुले आम खरेदी –विक्री सुरु झाल्याचे दिसते. याच काळात येथे कापूस दाबण्याचे प्रेस सुरु झाले गाठी बांधल्या जाऊ लागल्या 1870 मधे वॉलकार्ट ब्रदर्स या इंग्लीष फर्मने उमरावतीला जिनिंग प्रेस सुरु केली.[9] याच काळात 1870 मध्ये उमरावतीला 'बॅक ऑफ बॉम्बेची' षाखा सुरु झाली हिच उमरावतीची पहिली बॅक होय.

## मॅन्चेस्टर मध्ये ख्यातीप्राप्त 'उमरावतीचा कॉटन' :—

उमरावती मार्केटमध्ये परदेषात पाठविण्यासाठी खरेदी केला जाणारा कापूस हा परदेषातील मॅन्चेस्टर या गिरण्यांचे षहरात 'उमरावती कॉटन' या नावने ओळाला जात होता. असा उल्लेख 1861 मध्ये ब्रिग्ज या इंग्रज लेखकाने त्याच्या 'दि निजाम' या ग्रंथात केला आहे. इ.स. 1862 मध्ये अमेरिकन स्वातंत्र्य युध्दामुळे इंग्लंडला अमेरिकन कापुस मिळणे बंद झाले.त्यामुळे मॅन्चेस्टर व लॅकेषायरच्या कापड गिरण्या बंद पडण्याची वेळ आली तेव्हा हिंन्दुस्थानच्या कापसाला मागणी वाढली त्यामुळे कपाषीचे भावही वाढले ''23 रु. खंडीचा कापुस 175 रु. खंडी झाला.''[10] कापसाचे व्यापारात मुंबईचे कित्येक व्यापारी लक्षाधीष बनले या भाववाढीमुळे ''विजेच्या गतीने कापसाच्या धंद्याला वेग मिळाला. व कापसाचा पेरा अतोनात वाढला.''[11] हंगामात उमरावतीच्या कापूस बाजारात कापसाची आवक अतोनात वाढली.

## वऱ्हाडातातील कापसाच्या जाती :—

वऱ्हाडात बन्नी वजरी या दोन प्रकारच्या कापसाच्या प्रसिध्द जाती होत्या. 'बन्नी' हलक्या जमिनीत पेरल्या जात असे व तो वऱ्हाडातील उत्कृष्ट कापुस समजला जाई. एका एकरात 320 पौंड या कापसाचे उत्पन्न होते परंतु साफ केल्यानंतर 80 पौंड कापूस राहत होता. 'जरी' या प्रकारचा कापूस पूर्णा नदीच्या खोऱ्यात पिकविला जात होता त्याला खोल काळी जमीन लागत असे एकरी उत्पन्न बन्नी सारखचे होते. 'जरी' कापुस लांब धाग्याचा, जाडा व मजबूत असे. व्यापारी हा कापूस जास्त पसंत करीत असत कापूस साफ करतांना कापसाच्या दोन्ही जाती एकत्र करुन नंतर प्रेस केल्याजात असे आणि परदेषी विकण्यासाठी पाठविल्या जात या कापसाला एकत्र 'उमरावती कॉटन' हेच नांव होते.[12]

कपाषीचा व्यापार वाढु लागला त्याच बरोबर उमरावतीतील इतर धंद्यातही तेजी आली अषा तऱ्हेने दिसेंदिवस भरभराट होऊन कापूस व्यवसाय हा उमरावतीच्या आर्थीक जीवनाचा कणा बनला.

## संदर्भ :—

1. काळे या.मा. — वऱ्हाडचा इतिहास पृ.क्र. 377
2. केतकर श्री.व्य. — महाराष्ट्रीय ज्ञानकोष वि.9 पृ.क्र.49
3. महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर, अमरावती जिल्हा दि. आकृती 1969 पृ.क. 197
4. कॅप्टन रेनॉल्डचा रिपोर्ट — ( अमरावती षहराचा इतिहास करंजकर,भि.दे. भाग 1 व 2 पृ.क्र. 129)
5. हैद्राबाद अफेअर्स खंड 2,1880 पृ.क. 883
6. कारंजकर भि.दे. अमरावती षहराचा इतिहास पृ.क्र.132 हैद्राबाद अफेअर्स, खंड 2,1880 पृ.क्र.883
7. महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर, अमरावती जिल्हा दि. आकृती 1969 पृ.क. 416
8. गॅझेटिअर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रीक्टस् 1870, पृ.क्र.232
9. अमरावती जिल्हा गॅझेटिअर 1999, पृ.क्र. 237
10. गॅझेटिअर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रीक्टस् 1870 पृ. 228
11. काळे या.मा. वऱ्हाडचा इतिहास पृ.244
12. गॅझेटिअर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रीक्टस् 1870 पृ. 72—73.